## “भुसावळ येथे रासायनिक दुर्घटना प्रतिबंधित दिवस” संपन्न

३ डिसेंबर १९८४ मध्ये भोपाळ गळती कांडाने जवळ-जवळ २०,००० लोकांचा बळी घेतला आणि दीड लाखाहून अधिक लोकांना जीवघेण्या आजाराने ग्रासले. आपल्या प्लान्ट मध्ये देखील विविध रसायनांचा वापर करण्यात येत असल्याने संबंधित कर्मचारी, कंत्राटदार, कंत्राटी कामगार यांनी M.S.D.S. (Material Safety Data Sheet) वापर करावा. सुरक्षित साधनांचा योग्य वापर करावा.

आपण हा दिवस स्मृती दिवस पाळत आहोत. जेणेकरुन, आपणां सर्वांमध्ये जागृती निर्माण होईल, योग्य असा बोध होईल. अशा प्रकारची दुर्घटना भविष्यात होऊ नये म्हणून योग्य खबरदारी आणि सावधानता बाळगायची आहे. सुरक्षित उपायांची अंमलबजावणी व्यवस्थित करायची आहे. या कामी आपले सर्वांचे संपूर्ण सहकार्य अपेक्षित आहे. जेणेकरुन, आपण सुरक्षित राहू व Max Plant Performance देण्याच्या कामी पुढाकार घेऊ. या कामी आपण सर्वांना सुरक्षितता विभाग व व्यवस्थापनातर्फे अशी अपेक्षा करु की, आपण भविष्यात अशा तऱ्हेची शोकांतिका होऊ दिली नाही तर आपण बाधित नागरिकांना अल्पांशाने न्याय देऊ शकू.

सह-संचालक औद्योगिक सुरक्षा व आरोग्य संचालनालय, नाशिक यांच्या तर्फे प्राप्त या आशयाच्या पत्रानुसार भुसावळ औष्णिक विद्युत केंद्र, दिपनगर कॉलनी, राष्ट्रीय महामार्ग मुख्य द्वार व कारखाना मुख्य द्वार येथे “रासायनिक दुर्घटना प्रतिबंधित दिवस - ४ डिसेंबर २००९” असे बॅनर्स लावले. दिपनगर औष्णिक विद्युत केंद्रातील सर्व अधिकारी, कर्मचारी, कंत्राटदार, कंत्राटी कामगार दुपारी १२.०० वाजता फॅक्टरी मेन गेटजवळ एकत्र आले. सुरक्षितता अधिकारी श्री. एल.बी. चौधरी कार्यकारी अभियंता यांनी आपल्या कारखान्यात वापरात असलेल्या धोकादायक रासायनिक पदार्थ जसे हायड्रोक्लोरीक ॲसिड, कॉस्टिक सल्फयुरिक ॲसिड, क्लोरीन वायु, अमोनिया वायु, हायड्रोजन हायड्रेट, हायड्रोजन गॅस, लिक्विड अमोनिया इ. यांना हाताळताना सुरक्षित साधनांचा योग्य वापर करावा. सुरक्षित कृतींचा अवलंब करावा, असे आवाहन केले. वरील प्रसंगी सर्वश्री. चंद्रकांत पेटकर, महाव्यवस्थापक श्री. खाडिलकर, श्री. जाधव, श्री. चंद्रागडे, श्री. बुरडे, श्री. पाटील - अधीक्षक अभियंता, श्री. एल.बी. चौधरी सुरक्षितता अधिकारी (कार्यकारी अभियंता), श्री. हेमाडे - सुरक्षा अधिकारी, श्री. गायकवाड - कल्याण अधिकारी उपस्थित होते.

## जे.सी.आय. दिपनगर पॉवरसिटी अध्यक्षपदी आनंदगीर गोसावी



जे.आय.सी. दिपनगर पॉवरसिटीचा ७वा पदग्रहण समारंभ सदरहू कार्यक्रमासाठी श्री. व्ही.एस. पाटील (मुख्य महाव्यवस्थापक - भुसावळ औ.वि. केंद्राचे प्रमुख पाहुणे होते व श्री. पेटकर (महाव्यवस्थापक) हे गेस्ट ऑफ ऑनर होते. जेसी व्ही.पी. खाडिलकर जेसी जितेंद्र खंडाळे सर्व अधीक्षक अभियंते जेसी एन.पी. झोपे, जेसी ए.डी. देसाई, जेसी संजय अस्वले यावेळी उपस्थित होते.

## नवीन परळी संच. क्र. ७ चे कोल फायरिंग यशस्वी




नवीन परळी वीज प्रकल्प संच क्र. ७ (२५० मेगावॅट) हा कोळशावर चालविण्याची चाचणी दि. ०२/०१/२०१० रोजी २३.५५ वा. यशस्वीरित्या पार पाडण्यात आली. या चाचणीच्या यशस्वीतेसाठी महानिर्मितीचे संचालक




(प्रकल्प) श्री. चंद्रकांत थोटवे यांनी परळी येथे येऊन अधिकाऱ्यांना मार्गदर्शन केले, या प्रसंगी कार्यकारी संचालक (प्रकल्प) श्री. ए.टी. डवलेकर, कार्यकारी संचालक (सं. व सु.) श्री. व्ही.पी. सिंग, मुख्य महाव्यवस्थापक (पीएमजी) श्री. एम.आर. पाऊलझगडे, भुसावळचे प्रभारी मुख्य महाव्यवस्थापक (प्रकल्प) श्री. ए.आर. नंदनवार, कोराडी येथील मुख्य महाव्यवस्थापक (बांधकाम) श्री. ए.के. जोहरी, भुसावळ स्थापत्य विभागाचे मुख्य महाव्यवस्थापक श्री. ए.आर. अग्रवाल, परळी वीज केंद्राचे मुख्य महाव्यवस्थापक श्री. एच.डी. ढगे, महाव्यवस्थापक श्री. झिलपेलवार, प्रकल्पाचे महाव्यवस्थापक श्री. वाय.व्ही. गुजर, स्थापत्य विभागाचे महाव्यवस्थापक श्री. डी.एम. पुजारी, तसेच अधीक्षक अभियंते कै. व्ही.पी. वैद्य, सर्वश्री. बी.एम. दास, ए.एन. मोमले, डी.एम. वैद्य, खापेकर, कोठुळे हे उपस्थित होते. सदर चाचणी यशस्वीतेसाठी प्रकल्प व स्थापत्य विभागाच्या सर्व अधिकारी तसेच कर्मचारी यांनी अहोरात्र परिश्रम करुन सदर चाचणी वेळेत पूर्ण केली, याबद्दल महानिर्मिती कंपनीच्या आजी तसेच माजी वरिष्ठ अधिकाऱ्यांनी परळी प्रकल्पात काम करणाऱ्या टीमचे अभिनंदन केले. सदर चाचणी यशस्वीतेसाठी भेलचे श्री. गुप्ता व मे. सुनिल हायटेकचे श्री. भिवा बीडगर यांनी चाचणी यशस्वी होण्यासाठी सर्वतोपरी मदत करुन यशाचे शिखर गाठण्यासाठी मोलाचे सहकार्य दिले.